प्रत क्रमांक :-

गुप्त

महसूल व वन विभाग

मंत्रीमंडळासाठी टिपणी

विषय : राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण - २०२०

**प्रस्तावना :-**

पूर्वीपासून वने आणि विशेषत: राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य व व्याघ्र प्रकल्पांकडे पर्यटकांचा ओढा आहे. मध्यंतरीच्या कालावधीमध्ये वनविभागाद्वारे व्यापक जनजागृती केल्यामुळे जनसामान्यांचा निसर्गाप्रती ओढा वाढत असून व्याघ्र पर्यटना व्यतिरीक्त निसर्गामध्ये उपलब्ध अन्य बाबींकडेही पर्यटक आकर्षित होत आहेत. "पर्यावरण संवर्धन व स्थानिकांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने जबाबदारीने केलेली निसर्गाची सहल" म्हणजे निसर्ग पर्यटन आहे (TIES-१९९०). पर्यावरणावर किमान आघात, जनसामान्यांना निसर्ग शिक्षण, पर्यावरणाचे संवर्धन व स्थानिक जनतेला प्रत्यक्ष आर्थिक लाभ हे निसर्ग पर्यटनाचे मुख्य तत्व आहे.

निसर्ग पर्यटन क्षेत्रातील आर्थिक संधी व रोजगार निर्माण क्षमता लक्षात घेता निसर्ग पर्यटनाचा विकास करण्यासाठी शासन निर्णय क्र. डब्लुएलपी १००२/प्र.क्र.५३/फ-९ दिनांक २० फेब्रुवारी २००८ अन्वये राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण जाहीर करण्यात आले होते. शासन निर्णय क्रं.डब्ल्युएलपी ०४१५/प्रक्र.१०६/फ- १ दिनांक ८ डिसेंबर २०१५ अन्वये " महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ" स्थापन करण्यात आले. सदर मंडळ "संस्था नोंदणी अधिनियम १९६०" अंतर्गत नोंदणीकृत आहे.

संस्थेचे उपविधी नियम (Bye Laws) ला शासन निर्णय क्रं.०४.१५/ प्र.क्र.१०६/ अ/ फ-१, दिनांक २८ जानेवारी २०१६ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार मंडळाची संरचना करण्यात आली असून नियामक मंडळ व कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

भारत सरकारने जाहीर केलेले निसर्ग पर्यटन धोरण २०१८, व्याघ्र प्रकल्प व त्याचे सभोवताल क्षेत्रासाठी मार्गदर्शक तत्वे २०१२, राज्याचे पर्यटन धोरण २०१६ व वेळोवेळी प्राप्त सूचना यामध्ये नमूद बाबी व निसर्ग पर्यटन धोरणाची प्रभावीरित्या अमलबजावणी व्हावी या करिता राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबतचे नवीन धोरण पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## २.०० निसर्ग पर्यटन धोरणाचे ध्येय

निसर्ग व वन्यजीव संवर्धनाबाबत जागरुकता निर्माण करणे, तसेच स्थानिक, आदिवासी व पारंपरिक वन निवासी यांना आर्थिक उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करुन देणे व पर्यावरणीय, सांस्कृतिक व आर्थिक बाबी निरंतरपणे टिकविणे.

## ३.०० निसर्ग पर्यटनाची उद्दिष्टे

i. निसर्ग व वन्यजीव संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे.
ii. निसर्ग पर्यटन निसर्गावर किमान विपरीत परिणाम करणारे व पर्यावरण अबाधित ठेवणारे असावे.
iii. राज्यातील विपुल जैवविविधतेचा न्यायिक वापर (judicious use) करुन पारंपरिक वन निवासी यांना रोजगार व स्वयंरोजगारच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधार करणे.
iv. निसर्ग पर्यटनाचा व्यापक प्रमाणावर विकास करण्याकरीता या क्षेत्रातील हितसंबंधीयांशी भागीदारी प्रस्थापित करणे.

## ४.०० मार्गदर्शक तत्वे :-

## ४.०१ राज्य निसर्ग पर्यटन परिप्रेक्ष्य आराखडा (State Ecotourism Perspective Plan)

राज्यातील पर्यटन क्षमता असलेल्या विविध प्रकारच्या निसर्ग पर्यटन क्षेत्रांची निवड करुन महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ दहा वर्षाकरीता राज्य निसर्ग परिप्रेक्ष्य आराखडा तयार करेल.

## ४.०२ निसर्ग पर्यटन बृहत् आराखडा (Master Plan)

वने/वन्यजीव क्षेत्रात निसर्ग पर्यटनाला चालना देण्याकरीता संबंधित यंत्रणा निसर्ग पर्यटन स्थळनिहाय निसर्ग पर्यटन बृहत् आराखडा तयार करेल. सदर आराखडा संबंधित वन विभागाच्या/संरक्षित क्षेत्राच्या कार्य आयोजना/व्यवस्थापन आराखडयाशी सुसंगत असावा. या आराखडयामध्ये निवड केलेले क्षेत्र, फिरण्याकरिता रस्ते/मार्ग, प्रस्तावित निसर्ग पर्यटन सुविधा, अनुज्ञेय प्रवेश कालावधी, अनुज्ञेय पर्यटक संख्या/वाहन संख्या इत्यादींचा अंतर्भाव असेल. निसर्ग पर्यटनाकरीता वर्षातील निर्बंधीत विशिष्ट कालावधी, क्षेत्र इत्यादिंचा आराखडयांमध्ये स्पष्ट उल्लेख असेल.

## ४.०३ निसर्ग पर्यटन सर्वकष प्रकल्प अहवाल (DPR)

निसर्ग पर्यटन बृहत आराखडयाच्या अनुषंगाने संबंधित यंत्रणा सर्वंकष प्रकल्प अहवाल (DPR) तयार करेल. त्यामध्ये प्रकल्प कालावधी व प्रत्येक वर्षी करावयाच्या कामांबाबतची प्राधान्यता निश्चीत असेल. त्यामध्ये प्रकल्पनिहाय त्यावर्षी करावयाच्या कामांच्या कार्यबाबी व त्याकरीता आवश्यक अनुदान इत्यादी बाबींचा समावेश असेल.

## ४.०४ राज्य निसर्ग पर्यटन वार्षिक नियोजन आराखडा (State Ecotourism Annual Plan of Operations)

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ संबंधित यंत्रणेकडुन प्राप्त प्रकल्पनिहाय माहितीचे आधारे राज्यस्तरीय वार्षिक नियोजन आराखडा तयार करेल.

## ४.०५ निसर्ग पर्यटन क्षेत्र

वन/वन्यजीव क्षेत्रामधील निसर्ग पर्यटन क्षेत्र निश्चीत करण्यात यावे व निसर्ग पर्यटन विहित क्षेत्रामध्येच सिमित करण्यात यावे. वनक्षेत्रा व्यतिरिक्त निसर्ग पर्यटनाची क्षमता असलेल्या महसूल व खाजगी क्षेत्रातही निसर्ग पर्यटन विकसित करण्यात येईल.

## ४.०६ स्थानिकांचा सहभाग

निसर्ग पयर्टन व्यवस्थापनमध्ये स्थानिकांची प्रमुख भूमिका आहे. त्यांनी प्रत्यक्षात पर्यटन प्रकल्पांचे व्यवस्थापन करणे अपेक्षित आहे. स्थानिक, आदिवासी व पारंपरिक वन निवासी यांना पर्यटनाद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे अपेक्षित आहे, जेणेकरुन त्यांना पर्यटन क्षेत्राबद्दल आत्मियता निर्माण होऊन पर्यटन क्षेत्राच्या संवर्धनामध्ये ते महत्वाची भूमिका पार पाडतील.

संरक्षित क्षेत्रातील संवेदनशील गाभा (core) क्षेत्रावरील पर्यटनाचा ताण कमी करणे, तसेच स्थानिकांना लाभान्वीत करण्याकरिता वन्यजीवांचा उत्तम अधिवास असलेले संरक्षित क्षेत्रालगतचे बफर क्षेत्र, राखीव वने, महसूल क्षेत्र व खाजगी क्षेत्रांचा निसर्ग पर्यटनाच्या दृष्टिने विकास करण्यावर भर देण्यात येईल. कुठलेही निसर्ग पर्यटन स्थळ विकसित करतांना तेथील पर्यटनामुळे प्राप्त होणारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदे जास्तीत जास्त स्थानिकांना प्राप्त होतील यावर भर देण्यात येईल.

## ४.०७ निसर्ग पर्यटन क्षेत्रांमधील पायाभूत सुविधा

निसर्ग पर्यटन स्थळांवरील नैसर्गिक संपत्ती व जैव विविधतेचे संवर्धन व्हावे यादृष्टीने शक्यतोवर मोठी बांधकामे घेण्यात येणार नाही. निसर्ग पर्यटन स्थळी मुख्यत्वेकरुन खालील नमूद सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

१. निसर्ग परिचय केंद्र

२. निसर्ग शिक्षण संकुल

३. दर्जेदार स्वच्छतागृहे

४. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय

५. उपहार गृह

६. सोव्हीन्युअर शॉप

७. ॲम्फी थियेटर

८.आवश्यकतेनुसार कॅम्पिंग साईट/निवास व्यवस्था इत्यादी विकसित करणे

९. निसर्ग पायवाट

१०. विश्रांती स्थळे

११. सागर किनारे शॅकस् / हट / छत्र्या / डेक बेट.

पर्यटक संकुलाकरीता स्थायी बांधकामे, निवास/भोजन व्यवस्थेकरीता बांधकामे, नवीन रस्ते, पर्यटकांकरीता बंगले, व्यवसायिक निवास व्यवस्था इत्यादी. वन (संवर्धन) १९८० कायदयातील तरतूदीनुसार पूर्वपरवानगी शिवाय करण्यात येणार नाही. त्यामुळे अशा सोयीसुविधा वनेतर क्षेत्रावर करणे शक्य असल्यास त्याला प्राधान्य देण्यात यावे.

निसर्ग पर्यटनाकरीता आवश्यक बांधकामे व रंगसंगती निसर्गाशी मिळतीजुळती असावी. पर्यटकांकरीता उभारण्यात येणाऱ्या सोयीसुविधा, पर्यटन क्षेत्राच्या पर्यटक वहनक्षमतेच्या मर्यादेत असावे. गतकाळातील महत्वपूर्ण इमारतींचे आधुनिकीकरण (Renovation) करतांना शक्यतोवर पुन:स्थापन (Restoration) करण्यावर भर देण्यात येईल. निसर्ग पर्यटनामुळे स्थानिकांचे जीवनमान उंचावणे अपेक्षित असल्याने होम स्टे व आदरातिथ्य व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यात येईल.

### ४.०८ होम स्टे

राज्यातील दुर्गम ग्रामीण भागात बरीच अविकसित निसर्ग पर्यटन स्थळे आहेत, ज्यांना नैसर्गिक व सांस्कृतिक वारसा लाभला आहे, परंतु त्या ठिकाणी पर्यटकांसाठी योग्य निवास व न्याहारी सुविधा नसल्यामुळे पर्यटक या पर्यटन स्थळांचा आनंद घेण्यापासून वंचित राहतात. कित्येक स्थळांवर हॉटेल व्यावसायिक गुंतवणूक करण्यास इच्छूक नसतात. अशा सर्व निसर्ग पर्यटन ठिकाणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या पर्यटकांसाठी निवास आणि न्याहारी योजनेस चालना देणे आवश्यक आहे. या योजनेमुळे कमी गुंतवणूक करुन उपलब्ध संसाधनाचा उपयोग करुन स्थानिकांना रोजगाराची संधी प्राप्त करुन घेता येईल व पर्यटकांना निसर्ग अनुभूती सोबतच स्थानिक कुटुंबांसमवेत राहण्याची, त्यांची संस्कृती अनुभवण्याची व परंपरा समजून घेण्याची आणि महाराष्ट्रीय पाककृती चाखण्याची उत्कृष्ट संधी उपलब्ध होईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ संयुक्तरित्या सर्व निसर्ग पर्यटनस्थळी होम स्टे योजनेच्या संभाव्यतेचा शोध घेतील आणि त्यास प्रोत्साहित करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलतील. निसर्ग पर्यटन स्थळनिहाय नोंदणीकृत होम स्टेची यादी व आरक्षणाची सुविधा निसर्ग पर्यटनास चालना देण्याकरिता निर्माण करण्यात येणाऱ्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

### ४.०८ निसर्ग पर्यटन स्थळांची पर्यावरणपुरकता

पर्यावरण, वन्यजीव, वन्यजीव भ्रमणमार्ग, स्थानिक नैसर्गिक संसाधने व जैवविविधतेचे जतन करणे व त्यास क्षती पोहोचणार नाही या आधारभूत तत्वाच्या अनुषंगाने निसर्ग पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येईल. निसर्ग पर्यटनाकरिता निर्माण करण्यात येणाऱ्या सर्व शासकीय व खाजगी सोयीसुविधांमध्ये खालील बाबींचा समावेश अनिवार्य राहील.

१. घन कचरा व्यवस्थापन.

२. सांडपाण्याचे व्यवस्थापन.

३. जल पुनर्भरण, पावसाच्या पाण्याची साठवण व्यवस्था (rain water harvesting).

४. प्रकल्पाकरिता आवश्यक विजेच्या जास्तीत जास्त पुरवठा हा सौर ऊर्जा अथवा इतर हरित ऊर्जा स्त्रोतांपासून निर्माण करणे आवश्यक राहील.

५. वन्यप्राण्यांचे भ्रमणमार्ग खंडित होऊ नये याकरिता शासकीय / खाजगी पर्यटन संकुलाचे बांधकामाचे एकूण क्षेत्र नगर विकास विभाग व व्याघ्र राखीव क्षेत्राच्या स्थानिक सल्लागार समितीद्वारे वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार राहील. कुंपण फक्त बांधकाम क्षेत्राभोवती करण्यात येईल. उर्वरीत क्षेत्र हे कुंपण विरहीत राहील व ते हरित क्षेत्र म्हणून विकसित करण्यात येईल.

६. शासकीय / खाजगी पर्यटन संकुलाचे भोवती लावण्यात येणाऱ्या कृत्रिम प्रकाश स्त्रोतांमुळे वन्यजीवांवर प्रतिकूल परिणाम होतो. यामुळे पर्यटन संकुलाचे भोवती किमान प्रकाशाचे स्त्रोत बसविण्यात येतील. तसेच सदर प्रकाशाचे स्त्रोत हे वन्यजीव यांचेवर प्रतिकूल परिणाम करणार नाहीत अशा पद्धतीचे राहील.

७. शासकीय / खाजगी पर्यटन संकुलामध्ये ध्वनी प्रदूषण करणाऱ्या सर्व बाबींवर प्रतिबंध राहील.

८. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान यांचे समन्वयाने निसर्ग पर्यटन करिता निर्माण करण्यात येणाऱ्या सर्व सोयीसुविधा या पर्यावरणपूरक राहाव्यात या करिता व पर्यावरणपूरकतेचे अंकेक्षण करणे ( Environment audit) करिता मार्गदर्शक तत्वे तयार करेल.

**५.०० निसर्ग पर्यटनाकरीता अंमलबजावणीची कार्यपध्दती:-**

**५.०१ राज्य निसर्ग पर्यटन वार्षिक नियोजन आराखडा**

राज्यातील पर्यटन क्षमता असलेल्या विविध प्रकारच्या निसर्ग पर्यटन क्षेत्रांची निवड करुन महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ दहा वर्षाकरीता राज्य निसर्ग परिप्रेक्ष्य आराखडा तयार करेल.

पुढील वर्षाचे नियोजन करण्याकरिता दरवर्षी राज्य परिप्रेक्ष्य आराखडयामध्ये नमूद निसर्ग पर्यटन स्थळांपैकी काही क्षेत्रांची निवड करण्यात येईल.

त्यानुसार संबंधित यंत्रणेद्वारे निसर्ग पर्यटन स्थळांचे बृहत आराखडे (Master Plan) तयार करण्यात येतील व त्याआधारे सर्वंकष प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात येतील. त्याआधारे निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाकरीता मंडळ राज्य वार्षिक नियोजन आराखडा (APO) तयार करेल. त्यानुसार प्रकल्प आराखडयांची अंमलबजावणी करण्यात येईल.

## ५.०२ निसर्ग पर्यटन स्थळांची वर्गवारी

प्रस्तुत धोरणांतर्गत प्रामुख्याने खालील प्रकारच्या पर्यटन स्थळांचा विकास करण्यात येईल.

१. सृष्टी सौंदर्य पर्यटन (Landscape Tourism): यामध्ये नैसर्गिक वने, थंड हवेची ठिकाणे, धबधबे, वनफुलांनी सुशोभीत होणारी पठारे, उंच डोंगर, दऱ्यांमधील सृष्टी सौंदर्याची ठिकाणे इत्यादींचा समावेश राहील.

२. वन्यजीव पर्यटन (Wild Life Tourism) - यामध्ये व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य, इतर क्षेत्रे जेथे वन्यजीव दर्शन होईल अशा क्षेत्रांचा समावेश राहिल. तसेच वन्यप्राणी सफारी इत्यादीचा देखील यामध्ये समावेश असेल.

३. प्राचीन वारसा स्थळे पर्यटन (Heritage Tourism) - यामध्ये गड, किल्ले, जीवाश्म उद्यान (Fossil Parks) व पुरातत्त्व महत्व (Archaeological Importance) असलेल्या स्थळांचा समावेश राहिल.

४. नागरी वन/ निसर्ग उद्यान पर्यटन (Urban Forest/Nature Park Tourism) - यामध्ये नागरी वन उद्याने, बांबु उद्यान, फुलपाखरु उद्यान, जैवविविधता उद्यान, आरबोरेटम (Arboretum) अत्याधुनिक रोपवाटीका इत्यादींचा समावेश राहील.

५. साहसी क्रिडा पर्यटन (Adventure Sports Tourism) - यामध्ये ट्रेकींग, रॉक क्लांइबींग, रेपलिंग, सायकलींग, झिपलाईनिंग, वॉटर राफ्टिंग, पाण्यातील साहसी क्रिडा प्रकार इत्यादीचा समावेश राहील.

निसर्ग पर्यटन स्थळांची त्यांना भेट देणाऱ्या पर्यटकांच्या (profile) नुसार, पर्यटन स्थळाचे जागतिक/ राष्ट्रीय/ स्थानिक महत्त्वानुसार वर्गवारी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

१. अ श्रेणी - राष्ट्र व आंतरराष्ट्रस्तरीय

२. ब श्रेणी - राज्यस्तरीय

३. क श्रेणी - जिल्हास्तरीय.

अ व ब श्रेणीचे पर्यटन स्थळांच्या विकासाकरिता राज्य शासनाकडून राज्यस्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. जिल्हास्तर पर्यटन स्थळांचा विकास जिल्हा नियोजन समिती मार्फत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या निधीतून करण्यात येईल.

## ५.०३ पर्यटक वहन क्षमता निश्चिती करणे

निसर्ग पर्यटनामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये याकरीता निसर्ग पर्यटन स्थळांना भेटी देणारे पर्यटक व वाहनसंख्या निर्धारीत करण्याच्या दृष्टीने प्रत्येक प्रकल्पाची पर्यटक वहन क्षमता निश्चीत करण्यात येईल, जेणेकरुन पर्यटकांची/वाहनांची संख्या व प्रवेश वेळ निश्चित करता येईल.

व्याघ्र प्रकल्प व सभोवतील क्षेत्रातील पर्यटक वहन क्षमता निश्चित करीत असतांना मा. सर्वोच न्यायालयाचे दिनांक १६.१०.२०१२ रोजीचे पारित करण्यात आलेले आदेश व राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या दिनांक १९.१२.२०१२ च्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात येईल.

इतर निसर्ग पर्यटन क्षेत्रांची पर्यटक वहन क्षमता निश्चीत करतेवेळी खालील बाबी विचारात घेण्यात येतील.

१. वने/वन्यजीव/क्षेत्रामध्ये पर्यटनासाठी उपलब्ध क्षेत्र, प्रति दिवस शक्य असलेल्या पर्यटकांच्या फेऱ्या व पर्यटकांना प्रवेश देण्यासाठी उपलब्ध वेळेच्या आधारे भौतिक वहन क्षमता (Physical Carrying Capacity ) निश्चित करण्यात येईल.

२. जीवभौतिकीय, सामाजिक, परिस्थितिक, पर्यावरणी व व्यवस्थापकीय घटकांच्या आधारे संशुद्धि गुणकाची (Correction Factor) परिगणना करण्यात येईल व त्यानुसार भौतिक वहन क्षमतेत दुरुस्ती करून निसर्ग पर्यटन क्षेत्राची वास्तविक वहन क्षमता (Real Carrying Capacity) निश्चित करण्यात येईल.

३. प्रत्येक निसर्ग पर्यटन क्षेत्राच्या व्यवस्थापन क्षमता व तेथील वास्तविक वहन क्षमतेच्या अनुषंगाने परिणामी अनुज्ञेय वहन क्षमता (Effective Permissible Carrying Capacity) निश्चित करण्यात येईल.

४. निसर्ग पर्यटन क्षेत्रातील पर्यटन परिणामी अनुज्ञेय वहन क्षमतेच्या मर्यादेत करण्यात येईल.

वरीलप्रमाणे संरक्षित क्षेत्रातील निसर्ग पर्यटन क्षेत्रनिहाय परिणामी अनुज्ञेय वहन क्षमतेची परिगणना करून संरक्षित क्षेत्राचे संबंधित उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / सहाय्यक वन संरक्षक हे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्य जीव ) यांचेकडे मान्यतेसाठी सादर करतील.

व्याघ्र प्रकल्प व संरक्षित क्षेत्रातील पर्यटन क्षेत्राव्यतिरिक्त निसर्ग पर्यटन क्षेत्रातील निसर्ग पर्यटन क्षेत्र निहाय परिणामी अनुज्ञेय वहन क्षमतेची परिगणना करून संरक्षित क्षेत्राचे संबंधित उपवनसंरक्षक / विभागीय वन अधिकारी / सहाय्यक वन संरक्षक हे महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडे मान्यतेसाठी सादर करतील.

### ५.०४ पर्यटन स्थळांच्या विकासाकरीता निधी उपलब्धता

जिल्हा स्तरावरील निसर्ग पर्यटन स्थळांवर सोई-सुविधा निर्मितीकरिता जिल्हा नियोजन समितीव्दारे निधी उपलबध करुन देण्यात येईल. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य

स्तरावरील पर्यटन स्थळाचे विकासाकरीता राज्य शासन वन विभाग, आदिवासी विकास विभाग, पर्यटन विभागाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देईल. या व्यतिरीक्त आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील निसर्ग पर्यटन प्रकल्पांना निधी उपलब्धततेकरीता इतर स्रोतांचाही वापर करण्यात येईल. उदा. केंद्र शासन, उद्योजक सामाजिक उत्तरदायीत्व निधी (CSR), खाजगी संस्था व व्यक्तीकडून प्राप्त देणग्या, जिल्हा खनिकर्म निधी, आमदार /खासदार निधी इत्यादी.

### ५.०५ महसुलाचे वाटप

निसर्ग पर्यटनाद्वारे प्राप्त महसुलाचे हितसंबंधियांमध्ये वाटपाबाबत निसर्ग पर्यटन विकास आराखडयामध्ये समावेश करण्यात यावा. व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान (Tiger Conservation Foundation), कांदळवन प्रतिष्ठान (Mangrove Foundation) व ज्या प्रकल्पांमध्ये सध्या स्वीय प्रपंची खात्यांमध्ये (Personal Ledger Account) निसर्ग पर्यटनाद्वारे महसूल जमा होतो, ते प्रकल्प सद्यस्थितीतील पध्दतीप्रमाणेच कार्य करतील. असे प्रकल्प वगळून राज्यातील इतर सर्व निसर्ग पर्यटन प्रकल्पांकरीता 'महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मत्ता देखभाल प्रतिष्ठान' (Maharashtra Ecotourism Asset Maintenance Foundation) स्थापन करुन त्यामध्ये राज्य शासनाच्या हिश्याचा संपूर्ण महसूल जमा करण्याचे प्रावधान राहील. यामध्ये जमा महसूल रक्कम राज्यातील निसर्ग पर्यटन प्रकल्पांची देखभाल, दुरुस्ती व स्थानिक समुहांच्या विकासाकरिता तसेच संयुक्त वन व्यवस्थापान समिती/पारिस्थितीकी विकास समिती (JFM/EDC) च्या प्रोत्साहनार्थ वापरण्यात येईल. निसर्ग पर्यटन स्थळापासून प्राप्त निधीपैकी किमान ५०% निधी त्याच निसर्ग पर्यटन स्थळावर खर्च करण्यात येईल. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मत्ता देखभाल प्रतिष्ठान सर्वसाधारणपणे खाली दिलेल्या टक्केवारीनुसार निसर्ग पर्यटन प्रकल्पांना अनुदान वाटप करतील.

४०% निसर्ग पर्यटन प्रकल्पांचा देखभाल व दुरुस्ती खर्च

४०% निसर्ग पर्यटन प्रकल्पांमध्ये प्रत्यक्ष कार्यरत असलेले स्थानिक निवासी यांचे पारिश्रमिक,

१०% स्थानिक निवासी यांचेकरीता क्षमता बांधणी प्रशिक्षण खर्च

१०% स्थानिक पारिस्थीतीकी विकास समिती/संयुक्त वन व्यवस्थापन समितीला प्रोत्साहनपर अनुदान

**५.०६ महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मत्ता देखभाल प्रतिष्ठान॰** (Maharashtra Ecotourism Asset Maintenance Foundation)

परिच्छेद मध्ये नमूद केल्यानुसार राज्यातील इतर सर्व निसर्ग पर्यटन प्रकल्पांपासून प्राप्त होणारा महसूल तसेच सामाजिक उत्तरदायीत्व निधी (CSR), खाजगी संस्था व व्यक्तीकडून प्राप्त देणग्या /थेट निधी स्विकारता यावा यासाठी राज्यस्तरावर “महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मत्ता देखभाल प्रतिष्ठान” चे गठण करण्यात यावे असे प्रस्तावित करण्यात येते. हे प्रतिष्ठान संस्था नोंदणी अधिनियम, १९६० खाली नोंदणीकृत केले जाईल.

**नियामक मंडळ** - सदर प्रतिष्ठानाचे धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मा.मंत्री (वने), महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली एक नियामक मंडळ गठीत करण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे. नियामक मंडळाची रचना खालीलप्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| १ | मंत्री, वने, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (वने) | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, नियोजन विभाग | सदस्य |
| ५ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, पर्यावरण विभाग | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, पर्यटन विभाग | सदस्य |
| ७ | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख ), म.रा. नागपूर | सदस्य |
| ८ | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा, नागपूर | सदस्य |
| ९ | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास मंडळ | सदस्य |
| १० | व्यवस्थापकीय संचालक, राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर | सदस्य सचिव |

**कार्यकारी समिती** - नियामक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणांतर्गत प्रतिष्ठानाची कार्यविधी अंमलबजावणी करण्यास एक कार्यकारी समिती प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख यांचे अध्यक्षतेखाली नेमण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

कार्यकारी समितीची रचना खालीलप्रमाणे प्रस्तावित आहे:-

| | | |
|---|---|---|
| १ | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख ), म.रा. नागपूर | अध्यक्ष |
| २ | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), म.रा, नागपूर | सदस्य |
| ३ | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म. रा, नागपूर | सदस्य |
| ४ | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा) महाराष्ट्र राज्य, नागपूर | सदस्य |
| ५ | सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण | सदस्य |
| ६ | व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळ, नागपूर | सदस्य सचिव |

## ५.०७ तज्ञ/सल्लागारांचे पॅनल

निसर्ग पर्यटन विकास कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याकरीता निसर्ग पर्यटन विकासाशी संबंधित तज्ञ/सल्लागारांच्या (उदा. वास्तुशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, आदरातिथ्य व्यवस्थापक, निसर्ग निर्वचक (Naturalist), साहसी पर्यटन प्रशिक्षक इत्यादी) सेवा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडून संबंधित तज्ञांचे/सल्लागारांचे राज्यातील "अ व ब" श्रेणीचे पर्यटन प्रकल्पाकरिता स्वतंत्र पॅनल तयार करण्यात येईल. तज्ञांचे/सल्लागारांचे स्वतंत्र पॅनल करण्याकरिता प्रथम निसर्ग पर्यटन विकास मंडळाची कार्यकारी समिती उमेदवारांकडून आवेदन मागवील व विहीत निकषांच्या आधारे छाननी करुन नियामक मंडळाकडे सादर करतील. नियामक मंडळाचे मान्यतेने असे पॅनल अंतिम करण्यात येईल. कोणत्याही प्रकल्पाकरीता तज्ञ/सल्लागार यांची निवड करण्याकरीता पॅनेलवरील तज्ञ/सल्लागारांकडून तांत्रिक व वाणिज्यिक (Techno-Commercial Offer) दरपत्रके प्राप्त करुन "गुणवत्ता व किंमत आधारीत निवडीच्या (Quality Cum Cost Based

Selection) निकषांच्या आधारे प्रकल्पासाठी तज्ञ/सल्लागारांची निवड करण्यात येईल. वरील नमूद केल्या प्रमाणे स्थानिक निसर्ग पर्यटन सनियंत्रण समिती त्यांचे जिल्ह्यातील "क" श्रेणीच्या निसर्ग पर्यटन प्रकल्पाकरिता तज्ञांचे/सल्लागारांचे स्वतंत्र पॅनल तयार करेल.

### ५.०८ क्षमता बांधणी (Capacity Building)

निसर्ग पर्यटन विकास कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्याकरिता व्यवस्थापकांचे व समुदायांचे स्थितीज्ञान व क्षमता बांधणी करणे आवश्यक आहे. याकरिता राज्य शासनाच्या कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग व केंद्र शासनाचे कौशल्य विकास व उद्योग मंत्रालय यांच्या विविध योजनांच्या माध्यमातून निसर्ग पर्यटन क्षेत्रामध्ये काम करणारे स्थानिक, आदिवासी व पारंपरिक निवासी यांच्या क्षमता बांधणीसाठी काम करण्यात येईल. निसर्ग पर्यटन क्षेत्रात काम करणारे विविध घटक जसे की निसर्ग मार्गदर्शक, निसर्ग निर्वचक, जिप्सी चालक, होम स्टे ~~धारक~~, मालक / चालक, स्थानिक हस्तव्यवसायी, फोटोग्राफी, आदरातिथ्य क्षेत्रातील कामगार इत्यादी यांचे प्रशिक्षणा करिता स्वतंत्र अभ्यासक्रम निश्चित करण्यात येईल. अभ्यासक्रम निश्चित करून या क्षेत्रातील नावाजलेल्या संस्थांमार्फत क्षमता बांधणी करिता विविध प्रशिक्षण देण्यात येईल.

### ५.०९ स्थानिक निसर्ग पर्यटन सनियंत्रण समिती

देशातील व्याघ्र प्रकल्प व त्याभोवती होणारे पर्यटनाचे सनियंत्रण करणे करिता केंद्र शासनाचे १५ ऑक्टोबर २०१२ चे मार्गदर्शक सुचणेनुसार स्थानिक सल्लागार समिती स्थापन करण्यात आले आहेत. व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील पर्यटनाचे सनियंत्रण या पुढेही स्थानिक सल्लागार समिती मार्फत करण्यात येईल. राज्यातील इतर निसर्ग पर्यटन प्रकल्पाचे विकास व सनियंत्रणाचे दृष्टीने जिल्हा निहाय स्थानिक सनियंत्रण समित्या स्थापन करण्यात येतील. जिल्हा स्तरीय निसर्ग पर्यटन प्रकल्पांकरिता स्थानिक सनियंत्रण समितीच्या स्थापनेबाबत संबंधित मुख्य वनसंरक्षक / नियंत्रक अधिकारी निर्णय घेतील.

**"स्थानिक निसर्ग पर्यटन प्रकल्प सनियंत्रण समिती" ची रचना खालीलप्रमाणे असेल: -**

| | | |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | उप वनसंरक्षक / उप संचालक (वन्यजीव) (मुख्यालय) | सदस्य सचिव |
| ३ | संबंधित उप वनसंरक्षक / उप संचालक / विभागीय वन अधिकारी (ज्यांचे कार्य क्षेत्रात निसर्ग पर्यटन क्षेत्र आहे ) | सदस्य |
| ४ | महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी किंवा प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | मानद वन्यजीव रक्षक | सदस्य |
| ६ | परिस्थितिकी विकास समिती / संयुक्त वन व्यवस्थापन समितिचे अध्यक्ष | सदस्य |
| ७ | पर्यटन तज्ञ | सदस्य |
| ८ | वन्यजीव / वानिकी तज्ञ | सदस्य |

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे नियामक मंडळ पर्यटन तज्ञ व वानिकी/ वन्यजीव तज्ञांची नियुक्ती करतील.

**स्थानिक निसर्ग पर्यटन प्रकल्प व्यवस्थापन समितीची कर्तव्ये :-**

१. निसर्ग पर्यटनाशी संबंधित धोरण, मार्गदर्शक तत्वे व कार्यपद्धतीचे योग्य रित्या पालन व्हावे याकरिता प्रकल्पावर संनियंत्रण करणे व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाला आवश्यक त्या शिफारसी करणे.
२. जिल्ह्यातील सर्व निसर्ग पर्यटन सुविधा व पायाभूत सुविधांचे नियमितपणे (किमान अर्ध वार्षिक) अनुश्रवण करणे.
३. जिल्ह्यातील पर्यटन प्रकल्प मंजूर पर्यटन वहन क्षमतेनुसार होईल हे सुनिश्चित करणे व या करिता नियतकालिक पुनरावलोकन करणे.
४. स्थानिक जनसमुह/आदिवासी/पारंपारीक वननिवासी यांना संरक्षित क्षेत्राबाहेरील निसर्ग पर्यटन प्रकल्प विकासाबाबत योग्य मार्गदर्शन करणे.

५. निसर्ग पर्यटनाशी संबंधित सर्व बाबी तसेच सहल आयोजक (टूर-ऑपरेटर्स) पर्यटनाशी संबंधित हितसंबंधियाद्वारे तसेच त्यांचेमुळे नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास होऊ नये म्हणून सर्व सुरक्षा मानके, नियम व मार्गदर्शन तत्वांचे योग्य रित्या पालन होत असल्याबाबत संनियत्रण करणे.

६. अभिसारणाचे माध्यमातून जिल्ह्यातील निसर्ग पर्यटन विकास होणे करिता प्रयत्न करणे. निसर्ग प्राप्त महसुलाच्या विनियोगाबाबत निर्णय घेणे व कार्यपध्दती ठरविणे.

## ५.९ राज्यस्तरावरील निसर्ग पर्यटन संनियंत्रण

राज्यस्तरावर महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची कार्यकारी समिती सर्व निसर्ग पर्यटन प्रकल्प व्यवस्थापनाचे कार्यांवर संनियंत्रण ठेवेल.

## ५.९. संयुक्त वनव्यवस्थापन समिती / पर्यावरण परिस्थितिकी विकास समितीची कर्तव्ये

जिल्हास्तरीय पर्यटन स्थळांचे व्यवस्थापन हे स्थानिक पर्यावरण परिस्थितिकी विकास समिती / संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे मार्फत करण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती / पर्यावरण परिस्थितिकी विकास समितीचे कर्तव्य खालील प्रमाणे राहील.

१. निसर्ग पर्यटन क्षेत्राततील वन व वन्यजीवांचे संवर्धन करणे.

२. निसर्ग पर्यटन प्रकल्पाचे दैनंदिन व्यवस्थापन करणे.

३. निसर्ग पर्यटनापासून प्राप्त होणारा महसूल महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मत्ता देखभाल प्रतिष्ठान कडे जमा करणे.

४. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मत्ता देखभाल प्रतिष्ठानाचे माध्यमातून प्राप्त होणाऱ्या रकमेच्या अनुषंगाने वार्षिक कृती आराखडा तयार करणे व मान्यतेसाठी सादर करणे.

५. मान्यता प्राप्त वार्षिक कृती आराखडा प्रचलित वित्तीय नियमांचे अनुषंगाने राबवविणे.

६. निसर्ग पर्यटन पासून प्राप्त होणारा रोजगार स्थानिकांना सम प्रमाणात मिळेल या करिता उपलब्ध कामाचे चक्राकार पद्धतीने वाटप करणे.
७. निसर्ग पर्यटन प्रकल्पावर होणारा मासिक खर्च व प्राप्त होणारे मासिक महसूल ग्रामसभेसमोर मांडणे व त्यास ग्रामसभेची मंजूरी घेऊन तसा ठराव पारित करणे.
८. खर्च व उत्पन्नाचा मासिक रोखलेखा उपवनसंरक्षक यांना वन क्षेत्रपाल यांच्यामार्फत सादर करणे.
९. मासिक सभेचे इतिवृत्त संबंधित उपवनसंरक्षक / उपसंचालक / विभागीय वन अधिकारी यांना सादर करणे.

### ५.१० पर्यटक अभिमुखता

राज्यातील निसर्ग पर्यटन पर्यटक अभिमुख होणे करिता खालील विभिन्न पर्यटक लक्ष्य गटांची (target groups) आवश्यकता पूर्ण होण्याच्या दृष्टीने विविध सोयी उपलब्ध करुन देण्यात येतील. यामध्ये समाजातील सर्व स्तराच्या लोकांना सहभाग घेण्यात येईल.

१. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी समूह
२. व्यावसायिक संस्थेचे कर्मचारी व कौटुंबिक समुह
३. निसर्ग, पक्षी व वन्यजीव निरीक्षण करण्यास इच्छुक असलेले पर्यटक
४. साहसी क्रिडा प्रकारात इच्छुक पर्यटक

### ५.११ निसर्ग शिक्षण, माहिती व प्रसार

निसर्ग शिक्षण हे जाणीवा व संवेदना निर्माण करण्याचे माध्यम आहे आणि या माध्यमातून सृजनशील व जवाबदार नागरिक तयार होतात. वने आणि वन्यजीव यांचे महत्व शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांना कळाले तर हेच विद्यार्थी भविष्यात निसर्गातील विविध पैलूंचा आदर करतील. पर्यावरणाला त्रासदायक होईल अशा बाबी भविष्यात या विध्यार्थ्यांमार्फत होणार नाही आणि इतरांना ही हानी करण्यापासून ते रोखतील. निसर्ग शिक्षण विध्यार्थ्यांना निखळ आनंदाबरोबर

जवाबदारीची जाणीव निर्माण करून देणारे असेल. निसर्ग शिक्षणामध्ये खालील बाबींचा समावेश असेल:-

१. स्थानिक जैव विविधतेची संपूर्ण माहिती व महत्व विशाद करणे. मागील काही वर्षामध्ये परिसरातील जैव विविधते झालेले बदल व त्या मागील कारणे.
२. मानव निर्मित निसर्गाला झालेले धोके व आता कशा पद्धतीने निसर्ग संवर्धन केल्या जाऊ शकतो त्याबद्ल विविध मांडणीतून सादरीकरण.
३. निसर्ग व माणूस यातील नाते गुंफण उलगडत नेणे, जसे, अन्न - शेती - नदी - पाउस - जंगल अशा साध्या व सोप्या घडामोडीतून आनंदीदायी निसर्ग शिक्षण देणे. वन भ्रमंती व प्रत्यक्ष कृतीद्वारे निसर्गाचे महत्व विद्यार्थ्यांना समजावणे.
४. निसर्ग खेळ हे सुद्धा निसर्ग शिक्षणाचे उत्तम माध्यम आहे, यामध्ये निसर्गातील अन्न साखळी, परिसंस्था व त्याचे महत्व नमूद करणारे खेळ घेणे.
५. जिल्हानुसार जैव विविधता बदलत जाते त्यानुसार माहिती पुस्तक, पत्रक व पोस्टर तयार करणे. विद्यार्थ्यांना निसर्ग संवर्धन कृती प्रकल्प देऊन त्यांच्या मार्फतच विध्यार्थी जैव विविधता नोंद वही तयार करणे.
६. व्याख्यान, स्लाईड शो, फिल्म शो, परिसर भ्रमंती, वन भ्रमंती, पक्षी निरीक्षण, आकाश निरीक्षण विद्यार्थ्यांचे प्रकल्प, मोबाइल ॲप्लिकेशन इत्यादी चे माध्यमातून निसर्ग शिक्षणास चालना देणे.
७. पर्यावरण दूत म्हणून विध्यार्थ्यांची नेमणूक करणे व त्यामार्फत विविध कृतीतून निसर्ग विषयक विविध उपक्रम राबविणे.

निसर्ग शिक्षणास चालना देणे करिता सर्व जिल्ह्यांमध्ये निसर्गानुभव कार्यक्रम राबविण्यात येईल. या योजनेच्या माध्यमातून वरील विद्यार्थ्यांना निसर्गाच्या विविध घटकांचा अनुभव प्रदान करून देण्यात येईल. यामध्ये शासकीय, जिल्हा परिषद व आदिवासी आश्रम शाळेतील व इको-क्लब चे विद्यार्थ्यांनाही समाविष्ट करण्यात येईल. निसर्गानुभव कार्यक्रमाअंतर्गत पर्यावरण शिबीर आयोजित करण्यात येतील. विद्यार्थ्यांना निसर्गानुभव येण्याकरीता परिक्षेत्र निहाय निसर्ग पर्यटन स्थळाची निवड करण्यात येईल. निसर्गानुभव कार्यक्रमात अंतर्भुत विविध नैसर्गिक घटकांची माहिती देण्याकरीता निसर्ग/पर्यावरण तज्ञ व्यक्तींची निवड करण्यात येईल. शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या माहितीमध्ये एकसंधपणा असावा याद्दष्टीने निवड केलेल्या सर्व निसर्ग/पर्यावरण तज्ञांना राज्यातील नामवंत तज्ञांमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. निसर्गानुभव कार्यक्रम राज्यात राबविण्याकरिता मुलभुत सोई निर्माण करण्यात येतील.

## ५.१२ विस्तार/प्रसिध्दी

निसर्ग पर्यटनाचा जास्तीत जास्त प्रसार मुखोमुखी होण्याची आवश्यकता असली तरी प्रारंभिक स्थितीत निसर्ग पर्यटनाच्या यशास्वतेसाठी प्रसिध्दी देणे आवश्यक आहे. राज्यातील निसर्ग पर्यटनास चालना देण्याकरिता एक आकर्षक संकेतस्थळ विकसित करण्यात येईल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या संकेतस्थळावर सुध्दा लिंक देण्यात येईल. कालांतराने निसर्ग पर्यटन स्थळांचे Online Booking तसेच Virtual Tour ची सोय हया संकेतस्थळावर देण्यात येईल. तसेच फेसबुक, WhatsApp, Twitter, Instagram इत्यादी समाज माध्यमांचा प्रभावीरित्या वापर करण्यात येईल.

त्याचप्रमाणे जनसामान्यांमध्ये विविध माध्यमांद्वारे (उदा. फिरती प्रदर्शनी) व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी करण्यात येईल. जाहिरात, पत्रके, माहिती पत्रके याव्दारे निसर्ग पर्यटनाच्या कार्यक्रमाची जाहिरात करण्यात येईल व त्यास व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व इतर प्रतिष्ठित पर्यटन संस्थांशी संपर्क साधून इच्छुक पर्यटक समुहांना या योजनेची माहिती देण्यात येईल. या संस्थांना निसर्ग पर्यटनाचे पॅकेज देण्यात येईल.

### ५.१२.१ बैठकी /चर्चासत्र / कार्यशाळांचे आयोजन

राज्यात, देशात व आंतरराष्ट्रीय स्तरावर निसर्ग पर्यटन स्थळांची ओळख निर्माण व्हावी याद्दष्टीने मंडळ स्वत: बैठकी /चर्चासत्र / कार्यशाळा यात सहभागी होईल व असे कार्यक्रम आयोजित करेल.

### ५.१२.२ निसर्ग पर्यटन महोत्सव

मंडळ राज्यातील विविध भागात पक्षी निरीक्षण महोत्सव, कासव महोत्सव, कारवी महोत्सव, कांदळवन महोत्सव, आदिवासी संस्कृती महोत्सव, व्याघ्र महोत्सव, निसर्ग छायाचित्र प्रदर्शनी इत्यादीचे वन विभाग व महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे सहकार्याने आयोजन करेल.

## ५.१३ निसर्ग पर्यटनात हितसंबंधीयांशी समन्वय (Coordination with Stakeholders)

### ५.१३.१ स्थानिक निवासी

स्थानिक लोकांना पर्यटन वाढीमुळे येणारी आर्थिक सुबत्तता याबद्दल जाणीव व्हावी, तसेच त्यांनी पर्यटकांना सेवा देऊन स्वयं रोजगार मिळवावा तसेच स्वत: होऊन निसर्ग पर्यटनासाठी पुढाकार घेणे अपेक्षित आहे. तसेच जबाबदारीने निसर्ग पर्यटन क्षेत्राचे संवर्धन करणे अपेक्षित आहे. याकरिता संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम तसेच पारिस्थितीकीय विकास कार्यक्रम हे एक चांगले माध्यम होऊ शकेल. स्थानिकांनी प्रकल्प व्यवस्थापनामध्ये सहभागी व्हावे व त्याची क्षमता बांधणी करणे याकरिता आवश्यकतेनुसार तज्ञांच्या सेवा घेण्यात येतील.

### ५.१३.२ वन विभाग

वन विभागांतर्गत संबंधित यंत्रणेद्वारे निसर्ग पर्यटन प्रकल्पांचे विकास आराखडे कार्यआयोजना/वन्यजीव व्यवस्थापन आराखड्यांमधील तरतूदीनुसार करणे अपेक्षित आहे. तसेच ह्या कार्यक्रमास चालना देत असतांना भारतीय वन अधिनियम १९२७, वन (संवर्धन) अधिनियम १९८०, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम १९७२ व केंद्र शासनाद्वारे काढण्यात येणारे पर्यावरण संवेदनशील क्षेत्राचे अधिसूचनेतील तरतुदींचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे.

निसर्ग पर्यटन विकास मंडळाचा सल्ला व मार्गदर्शनानुसार निसर्ग पर्यटन स्थळनिहाय बृहत् आराखडा (Master Plan) तयार करून मंडळाचे कार्यकारी समितीद्वारे मंजुरी प्राप्त करणे व त्यानुरूप सर्वंकष प्रकल्प अहवाल (DPR) तयार करून त्याची मंडळांचे व्यवस्थापकीय संचालकांकडून मान्यता प्राप्त करणे आवश्यक आहे. अशा तऱ्हेने मान्यताप्राप्त सर्वंकष प्रकल्प अहवाला (DPR) मध्ये नमूद केल्यानुसार कार्यबाबींचा पुढील वर्षाचा प्रकल्पनिहाय वार्षिक नियोजन आराखडा (APO) तयार करुन दर वर्षी फेब्रुवारी पर्यंत मंडळाचे कार्यकारी समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील. वन विभाग त्यानुसार विकासकामांची अंमलबजावणी करेल व शक्यतोवर प्रकल्पाच्या दैनंदिन व्यवस्थापनात स्थानिक समुहाचा सहभाग घेण्यात येईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये सर्वंकष प्रकल्प अहवालामध्ये (DPR) नमूद बाबीं व्यतिरिक्त त्याच क्षेत्रात निसर्ग पर्यटनाशी संबंधित विकासकामे करावयाची असल्यास संबंधित यंत्रणेद्वारे अतिरिक्त प्रकल्प अहवाल तयार करुन मंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

### ५.१३.३ वन विकास महामंडळ, महाराष्ट्र, मर्या. (Forest Development Corporation of Maharashtra Ltd.)

महाराष्ट्र वन विकास महामंडळाकडे व्यवस्थापनाकरीता असलेल्या क्षेत्रातील निसर्ग पर्यटन प्रकल्पांचा विकासाकरीता वर उल्लेखित केल्यानुसार वनविभागाप्रमाणे महामंडळाकडून कार्यवाही करण्यात येईल.

### ५.१३.४ महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ (Maharashtra Eco-Tourism Development Board)

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ राज्यातील निसर्ग पर्यटन विकासाकरीता केन्द्रस्थ यंत्रणा म्हणून कार्य करेल. सदर मंडळाचा मुख्य उदेश निसर्ग पर्यटनास चालना देणे हा असेल. मंडळ निसर्ग पर्यटन विकासाची दिशा निश्चित करण्याकरीता राज्य निसर्ग पर्यटन परिप्रेक्ष्य आराखडा (Perspective Plan) तयार करेल व या आराखडयास नियामक मंडळाची मान्यता घेईल. वन विभागांतर्गत संबंधित यंत्रणेकडून / महाराष्ट्र वन विकास महामंडळाकडून प्राप्त निसर्ग पर्यटन स्थळांचे बृहत आराखडे मंडळाच्या कार्यकारी समितीद्वारे व सर्वंकष प्रकल्प अहवाल (DPR) मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकाद्वारे मंजूर करण्याची बाब हाताळण्यात येईल. मंडळाच्या सल्ला व मार्गदर्शनानुसारच निसर्ग पर्यटन स्थळनिहाय बृहत आराखडे (Master Plan) व त्यानुसार सर्वंकष प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात येईल. याकरिता मंडळ मार्गदर्शक तत्वे निश्चीत करेल. कार्यकारी यंत्रणेद्वारे वार्षीक नियोजन आराखडयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी दरम्यान मंडळ आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करेल. महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ काही निसर्ग पर्यटन स्थळांचे व्यवस्थापन देखील करु शकेल. राज्यस्तरीय निसर्ग पर्यटन स्थळांचे विकासाकरीता प्रकल्पनिहाय प्राप्त प्रस्तावांना मंडळाचे शिफारसीनुसार राज्य शासन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विचार करेल.

राज्यातील विविध विभागात विकसीत केलेल्या निसर्ग पर्यटन प्रकल्पांचा समावेश करुन मंडळ पर्यटन सर्कीट (Tourism Circuits) विकसीत करेल.

### ५.१३.५ महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC)

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ ही राज्याच्या पर्यटनाची केन्द्रस्थ यंत्रणा आहे. सदर महामंडळ प्रायोगिक तत्वावर पर्यटनाचे दृष्टीने महत्त्वाचे वनविश्रामगृहांचे पुनरुज्जीवन/पुन: स्थापन करेल व त्यांचे स्थानिकांचे मार्फत व्यवस्थापन करेल. याकरिता निसर्ग पर्यटन विकास मंडळ, वन

विभाग व वन विकास महामंडळ यांचे सोबत आवश्यकतेनुसार समझौता करार करेल. महामंडळ निवास व्यवस्था, व्याघ्र सफारी व परिसरातील इतर पर्यटक स्थळांचा समावेश होईल असे पॅकेज पर्यटकांसाठी तयार करेल व अशा पॅकेज करिता वन विभाग व्याघ्र सफारी चे काही प्रवेश राखीव ठेवेल. या प्रमाणे व्याघ्र पर्यटनाचे सहाय्याने स्थानिक पर्यटन स्थळांना चालना मिळेल. महामंडळ स्थानिकांना रोजगार निर्मीतीकरिता क्षमता बांधणी, प्रचार-प्रसार, तसेच महामंडळाचे पर्यटन सर्किटमध्ये निसर्ग पर्यटन स्थळांचा समावेश करणे इत्यादीबाबत महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाला सहकार्य करेल.

महामंडळ पर्यटकांच्या सोई-सुविधेच्या दृष्टिने शासकीय / खाजगी क्षेत्रावर आवश्यकतेनुसार कॅम्पिंग व इतर व्यवस्था उभारण्यासाठी प्रयत्न करेल. एकदा निसर्ग पर्यटनाचा कार्यक्रम तयार झाला व सर्व सोयी तयार झाल्यावर महामंडळ निसर्ग पर्यटन स्थळांना त्यांच्या कार्यक्रम पत्रिकेवर घेऊन निसर्ग पर्यटनास चालना देईल. तसेच सहल व्यवस्थापक, हॉटेल मालक तसेच स्थानिक लोकसमुहांचा आघाडीचा सहभाग घेऊन निसर्ग पर्यटनाची स्थळे राज्याच्या पर्यटन नकाशावर आणण्याबाबत प्रयत्न करेल. वन क्षेत्रातील सहली आयोजित करण्यासाठी सदर महामंडळ वन विभाग व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळा सोबत योग्य तो समन्वय ठेवेल. या संबंधात महामंडळ आवश्यकतेनुसार वनविभाग, निसर्ग पर्यटन विकास मंडळाशी समझोता करार (MoU) करेल. राज्य निसर्ग पर्यटन धोरणात नमूद तत्वे व निसर्ग पर्यटन विकास मंडळाचे सल्यानुसार महामंडळ वनक्षेत्राबाहेर निसर्ग पर्यटन क्षेत्र विकसीत करतील.

### ५.१३.६ खाजगी निसर्ग पर्यटन उद्योजक (Private Eco Tourism Entrepreneur)

राज्यामध्ये निसर्ग पर्यटनास चालना देण्यासाठी खाजगी निसर्ग पर्यटन उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येईल. खाजगी निसर्ग पर्यटन उद्योजकांनी स्थानिक जनता तसेच वन विभाग व महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या सहकार्याने पर्यटकांना निसर्ग पर्यटनाकरीता येण्यास उद्युक्त करावे. तसेच स्थानिक लोकांच्या सहकार्याने पर्यटकांची राहण्याची, खाण्यापिण्याची व्यवस्था, पर्यावरणाचा कोणत्याही प्रकारचा ऱ्हास न करता खाजगी किंवा शासकीय जमिनीवर

करावी. निर्माण होणा-या रोजगाराच्या संधी जास्तीत जास्त प्रमाणात स्थानिक लोकांनाच मिळेल याची त्यांनी दखल घ्यावी. त्याचप्रमाणे त्यांना लागणारी सामुग्री ही जास्तीत जास्त स्थानिकरित्या मिळविण्याचा प्रयत्न करावा जेणेकरुन पर्यटनाच्या अनुषंगिक स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

### ५.१३.७ राज्य शासन

राज्य शासन राज्य स्तरावरील निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाच्या कार्यक्रमात जास्तीत जास्त आर्थिक योगदान देण्याचा प्रयत्न करेल. जिल्हा स्तरावरील निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासासाठी संबंधित जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समितीद्वारे निधी उपलब्ध करून देण्यात येईल. राज्य शासनाने मंजूर केलेल्या पर्यटन धोरणा अंतर्गत प्रस्तावित वित्तीय सहाय्य व इतर सुविधा निसर्ग पर्यटन प्रकल्पांनाही लागू होतील. निसर्ग पर्यटन स्थळांवर पर्यटकांकरिता आवश्यक सोई - सुविधा निर्माण करण्याकरिता शक्यतोवर वनेत्तर जमिनीचा वापर करण्यात येईल. याकरिता प्रकल्प क्षेत्रानजीकची शासकीय / खाजगी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्न करेल.

### ५.१३.८ निसर्ग पर्यटन स्थळांचे मूल्यांकन व संनियंत्रण

निसर्ग पर्यटन स्थळांवर येणा-या पर्यटकांच्या वयोगटानुसार आवश्यकता, आवडी-निवडी, निसर्ग पर्यटन स्थळाला भेटी देणा-या पर्यटकांकडून त्यांचे भेटीनंतरचे अभिप्राय इत्यादींचा अभ्यास करुन त्याची पूर्तता होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे, निसर्ग पर्यटन स्थळांच्या परिसरात उपलब्ध सोयी सुविधांचे मूल्यांकन करणे व निसर्ग पर्यटन स्थळी होणा-या विकास कामांचे संनियंत्रण करणे तसेच स्थानिक जनतेचा सहभाग घेऊन निसर्ग पर्यटन स्थळे स्वयंचलीत करणे बाबत महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ सर्वोतोपरी प्रयत्न करेल. तसेच निसर्ग पर्यटन स्थळानजीक पर्यटकांकरीता खाजगीरित्या उभारण्यात आलेल्या सोयीसुविधा, हरीत उर्जेचा वापर, बांधकाम, प्रदूषण टाळण्याकरिता उपाय योजना इत्यादी बाबत मंडळ नियमन करेल.

## ६. वार्षीक अहवाल

दरवर्षी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळातर्फे गतवर्षी केलेल्या विविध कामांचा वार्षीक अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

विभागाच्या प्रस्तावावर पर्यटन विभागाचे अभिप्राय :-

पर्यटन विभागाच्या अभिप्रायावर वन विभागाची प्रतिक्रिया :-

विभागाच्या प्रस्तावावर नियोजन विभागाचे अभिप्राय :

नियोजन विभागाच्या अभिप्रायावर वन विभागाची प्रतिक्रिया :-

विभागाच्या प्रस्तावावर वित्त विभागाचे अभिप्राय :

वित्त विभागाच्या अभिप्रायावर वन विभागाची प्रतिक्रिया :-

**मंत्रिमंडळाच्या मान्यतेकरिता प्रस्ताव :-**

१. प्रस्तुत मंत्रीमंडळ टिपणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे “महाराष्ट्र राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण - २०२०” यास मान्यता प्रदान करण्यात यावी. तसेच सोबत जोडलेले प्रारुप शासन निर्णय निर्गमित करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी.
२. सीएसआर व इतर निधी प्राप्त करुन घेण्यासाठी वन विभागाच्या नियंत्रणाखाली ‘महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मत्ता देखभाल प्रतिष्ठान’ चे गठन करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी.
३. ह्या कामी आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यासाठी व आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी वन विभागास प्राधिकृत करण्यात यावे.

प्रस्ताव धोरणात्मक निर्णयाबाबतचा असून मा.मंत्री, वने यांनी पाहिला आहे.

ठिकाण :- मुंबई.

दिनांक :-   सप्टेंबर, २०२०

( मिलिंद म्हैसकर )
प्रधान सचिव (वने)